बुधवार, दि ५ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २३ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## अजित पवार हे मराठा द्रोही व विश्वासघातकी-अरविंद देशमुख



**जालना । प्रतिनिधी -** उपमुख्यमंत्री अजित पवार हे पालकमंत्री असलेल्या पुण्यात कोयता गँग, वाळू माफिया आणि वाढत्या गुन्हेगारीने थैमान घातले असताना, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हात त्यावर नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरले आहेत. आता हेच लोण बीड जिल्ह्यातही पसरले आहे. बीडच्या पालकमंत्रीपदाची सूत्रे अजित पवार यांनी हाती घेतली खरी, पण त्यामागील उद्देश समाजहित नसून मंत्री धनंजय मुंडे आणि त्यांच्या गुन्हेगार कार्यकर्त्यांना अभय देणे हाच आहे, असे स्पष्ट दिसत आहे. धनंजय मुंडेंच्या कार्यकर्त्यांचे गुन्हे झाकण्यासाठीच हे राजकारण सुरू आहे. मराठा समाजावर अन्याय होत असताना, अत्याचार वाढत असताना अजित पवार हे सत्तेचा उपभोग घेत आहेत. मराठ्यांच्या हक्काच्या लढ्याला विरोध करणारे आणि गुन्हेगारांचे रक्षण करणारे अजित पवार हे मराठा द्रोही असल्याचा मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी केला आहे. धनंजय मुंडे यांची मंत्रीपदावरून हकाकलपट्टी तर झालीच पाहिजे, मात्र, अजित पवारांनी स्वतः राजीनामा द्यायला हवा होता. मराठा समाजासाठी लाजिरवाणे अजित पवार हे मंत्री तात्काळ पदावरून हटले पाहिजेत! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्तक्षेपामुळेच ही प्रकरणे गंभीरपणे घेतली जात आहेत, अन्यथा अजित पवार आणि धनंजय मुंडे यांच्या छत्रछायेखाली गुन्हेगारी अजून फोफावली असती. मराठा समाजावर वार करणारे, गुन्हेगारांना पाठीशी घालणारे हे मंत्री जनतेला नको आहेत! नाही जनाची, नाही मनाची... थोडी तरी तरी लाज वाटते का? राजीनामा द्या आणि समाजाची माफी मागा, अशी मागणी अरविंद देशमुख यांनी केली आहे.

## ऑस्ट्रेलियाला नमवत भारत अंतिम फेरीत

**दुबई -** विराट कोहलीच्या ८४ धावा, विराट-श्रेयसची ९४ धावांची भागीदारी, हार्दिकचे दोन षटकार आणि राहुलच्या विजयी षटकारासह भारताने ऑस्ट्रेलियाकडून आयसीसी स्पर्धांच्या पराभवाचा बदला घेत दणदणीत विजय नोंदवला आहे. भारताने उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजीसह ऑस्ट्रेलियाला नमवत शानदार विजय मिळवला आहे. यासह भारताने ऑस्ट्रेलियावर ४ विकेट्सने मोठा विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली आहे. तत्पूर्वी, जेव्हा ऑस्ट्रेलियन संघ फलंदाजी करत होता तेव्हा कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि लेक्स कॅरी वगळता इतर कोणत्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आला नाही. स्टीव्ह स्मिथने ९६ चेंडूत ७३ धावांची खेळी केली, तर लेक्स कॅरीनेही ५७ चेंडूत ६१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. उर्वरित फलंदाजांपैकी एकाही फलंदाजाला ५० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. याचे कारण भारतीय गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केली. मोहम्मद शमीने १० षटकांत ४८ धावांत तीन विकेट घेतले, तर वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी दोन विकेट घेतले. हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. कुलदीप यादव हा एकमेव गोलंदाज होता ज्याला एकही विकेट मिळाली नाही.



### युवा आदर्श
### राजी ना मा...

एक कागद खिशात
घे तयार राजीनामा
सारवा सारव करा
कधीही येतो कामा
जयकारां तयार तो
सोबतचा लवाजमा
राजकीय कारकीर्द
उतरून ठेवा विमा
श्रेष्ठी ठेवे वरदहस्त
कशाला करी तमा
आरोप प्रत्यारोपाचा
क्षणैक होई खातमा
मिडीया मैत्री भली
सोबत घे लवाजमा
फसती लोक भोळे
करावा सहज मामा
होता कुठेही उद्रेक
हरेकृष्णा हरे रामा
हाताबाहेर स्थिती
मागून टाका क्षमा
शिडकावा शांतीचा
वाढू लागता उष्मा
दिपवून टाके डोळे
नेते मंडळी करिष्मा
गप्पगार हो विरोधी
बडे दांडगे जे सुरमा
भय चकीत समस्त
डोळ्यां घाले सुरमा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## शेतकरी व नागरिकांच्या मागण्यांसाठी काँग्रेसचा मोर्चा
# निवडणुकीपूर्वीच्या आश्वासनांची पूर्तता करण्याची मागणी





**जालना । प्रतिनिधी -** राज्य सरकारच्या निवडणुकीपूर्वीच्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याने, तसेच शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा काढण्यात आला. शेतकरी, महिला, युवक आणि नागरिकांनी या आंदोलनात उत्स्फूर्त सहभाग घेतला. हा मोर्चा डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा, नुतन वसाहत येथून प्रारंभ होऊन अंबड चौफुली मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पाळली जात नसल्याने त्यांच्यात तीव्र असंतोष आहे. शेतकरी कर्जमाफी तातडीने जाहीर करावी, दुष्काळग्रस्त भागात पाणीटंचाई निवारणासाठी प्रभावी उपाययोजना करावी, नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळावी, तसेच पीक विम्याचा लाभ त्वरित मिळावा, अशा मागण्या करण्यात आल्या. तसेच मागेल त्याला सौर कृषी पंप योजना तातडीने लागू करावी, शेतकऱ्यांना योग्य हमीभाव मिळावा आणि ठिबक सिंचनासह विविध कृषी अनुदान योजनांची तत्काळ अंमलबजावणी करावी, असे काँग्रेसच्या शिष्टमंडळाने स्पष्ट केले.

वीजपुरवठा आणि दुधाला हमीभाव यासंदर्भात ठोस मागण्या

ग्रामीण भागातील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करावा, तसेच शेतकऱ्यांना रात्रीऐवजी दिवसा वीज द्यावी आणि थकबाकी वीजबील माफ करावे, अशीही मागणी करण्यात आली. याशिवाय, दुधाला किमान रु ४० प्रति लिटर हमीभाव मिळावा, दूध उत्पादकांना वेळेवर अनुदान मिळावे आणि पशुखाद्यावर अनुदान द्यावे, अशा मागण्यांचा समावेश होता.

महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या ऐरणीवर

महिलांसाठी जाहीर केलेली लाडकी बहिण योजना कोणत्याही अटींशिवाय लागू करावी आणि दरमहा रु २,१०० मदत नियमित मिळावी, अशा मागण्यांसह घरकुल योजना, श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजनांच्या लाभार्थ्यांना वेळेवर मदत मिळावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच केसरी रेशन कार्डधारकांना पुन्हा रेशन मिळावे आणि दिव्यांगांच्या मानधनात वाढ करावी, असा आग्रह काँग्रेसच्या शिष्टमंडळाने धरला.

शासनाने मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

या आंदोलनात काँग्रेसचे नेते मा खा डॉ. कल्याण काळे, जिल्हा पक्षप्रभारी नामदेव पवार, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, माजी आ कैलास गोरंट्याल आदी पदाधिकारी आणि शेतकरी, नागरिक व काँग्रेसचे सर्व विभाग सेलचे जिल्हाध्यक्ष,ता.अध्यक्ष उपस्थित होते. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने त्वरित पूर्ण करावीत, अन्यथा लवकरच अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.

मोर्च्याचा वेळ व समारोप

हा आंदोलन मोर्चा सोमवार, दिनांक ४ मार्च २०२५ रोजी सकाळी १२:३० वाजता सुरू झाला आणि दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे समारोप करण्यात आला. काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले.

शासनाने या मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास शेतकरी आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरतील, असे काँग्रेसने ठणकावून सांगितले. या प्रसंगी प्रदेश सरचिटणीस ड राम कुराडे,कल्याणराव दळे,राम सावंत, विभाग सेल अध्यक्ष सौ नंदाताई पवार, राहुल देशमुख, बदर चाऊस, रफिक सर,शेख शमशु, शिवप्रसाद चितळकर,रघुवीर गुडे, सुरेश गवळी, ता.अध्यक्ष त्रिबंकराव पाबळे, ज्ञानेश्वर शिंदे,रामप्रसाद खरात, कल्याणराव तारडे,वैभव उगले,जाकेर डावगावकर, जावेद बागवान,इब्राहिम भाई,विनोद रत्नपारखे,महावीर ढक्का,वाजीद खान पठाण, रमेश गोरक्षक,

संतोष अन्नदाते, सोपान सपकाळ यांच्यासह आघाडी विभाग व सेल चे जिल्हा अध्यक्ष व पदाधिकारी व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# संपादकीय

## मातृभाषेतून शिक्षण काळाची गरज

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यम वर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# अभिजात मराठी ज्ञानभाषा व जनभाषा



नुकताच मराठी भाषा गौरव दिन सर्वत्र उत्साहात साजरा झाला. त्याच दिवशी दादरला मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने श्री सर्वोदय एज्युकेशनल ट्रस्टच्या सहकार्याने धुरु हॉलमध्ये राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा व 'अभिजात मराठी भाषा चला ज्ञानभाषा करूया' या राज्यस्तरीय लेख स्पर्धेतील स्पर्धकांचा सत्कार समारोह झाला. दिनांक २१, २२, २३ फेब्रुवारी रोजी दिल्लीत संपन्न झालेले अखिल भारतीय साहित्य संमेलन, मराठवाड्यातील विद्रोही साहित्य संमेलन आणि संपूर्ण राज्यात ठीक ठिकाणी मराठी गौरव दिनानिमित्त झालेल्या विविध कार्यक्रमांमध्ये एकच गोष्ट सातत्याने बोलली गेली ती म्हणजे मराठी ही ज्ञानभाषा झाली पाहिजे, जनभाषा झाली पाहिजे. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा खऱ्या अर्थाने टिकवायचा असेल तर माझ्या मते आपण या संदर्भात मुळावर काम करणे अत्यंत गरजेचे आहे. हे मूळ म्हणजे शालेय स्तरावर मुलांना सर्व विषय मातृभाषेतून म्हणजे मराठीतून शिकवणे, उच्च शिक्षण हे सुद्धा मराठीतून घेता येईल अशी शैक्षणिक व्यवस्था निर्माण करणे. तर आणि तरच ती पाझरत जाऊन भविष्यात खऱ्या अर्थाने अभिजातता प्राप्त करेल. आजच्यासारखी तिच्या भविष्याबद्दल आणि भवितव्याबद्दल शंका कोणी घेणार नाही. अर्थात त्यासाठी साने गुरुजींना अभिप्रेत असलेल्या आंतरभारतीचा स्वीकार करणे अपेक्षित आहे. अमराठी शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करणे ही अनिवार्यच आहे. सध्याच्या इंग्रजाळलेल्या स्थितीत प्रत्यक्षात हे कितपत उतरेल हा खरोखर एक मोठा प्रश्न आहे. छएझ २०20 मध्ये 'प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून मोफत व सक्तीचे दिले गेले पाहिजे' असे म्हटले आहे. त्याची अंमलबजावणी आपल्याच हातात आहे. या आधीच्याही प्रत्येक शैक्षणिक धोरणात प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून आणि सर्वांना मोफत सक्तीचे देणे बंधनकारक होते. पण प्रत्यक्षात तसे घडलेले दिसत नाही. कागदावर लिहिलेले धोरण व प्रत्यक्षात अंमलबजावणी यात आढळून येणारी विसंगती येथे आपल्याला स्पष्ट दिसते. आजही देशात अनेक मुलं शिक्षणापासून वंचित आहेत. याची जबाबदारी घेणारी व्यवस्था किंवा यंत्रणा नाही हा कदाचित यातील दोष असू शकतो. सध्या मराठी शाळांची अवस्था फारच दयनीय आहे. त्याला आपण सर्वच मराठी भाषिक जबाबदार आहोत. कोणा एकावर याचा दोष देणे हा सुद्धा एक दोषच ठरेल. त्यामुळे इतरांनी कोणी काय करायचे हे सांगणे मला योग्य वाटत नाही. अनुकरणाने शिकणं हा मानवी स्वभाव आहे. त्यामुळे अशा प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा अनेक शाळांमध्ये व व्यवस्थापनांमध्ये मराठी भाषे संदर्भात दर्जेदार काम होत आहे. तेव्हा त्या ठिकाणी नेमके काय होते याचा शोध घेऊन त्याचे अनुकरण करणे अपेक्षित आहे. तसं केल्यास या समस्येवरचा उपाय मिळू शकतो अशी माझी धारणा आहे. आज माझी अनुदानित मराठी शाळा डोंबिवली सारख्या सुसंस्कृत शहरात असून सुद्धा विद्यार्थ्यांनी भरलेली असते. अर्थात यासाठी माझी संस्था उदय शिक्षण प्रसारक मंडळ, आमच्या शाळेच्या सन्माननीय मुख्याध्यापिका आणि आम्ही सर्व शिक्षक यासाठी अखंड प्रयत्नरत असतो. त्याचेच हे फळ आहे. माझ्या मते यापेक्षाही खूप चांगलं काम करणाऱ्या अनेक मराठी अनुदानित शाळा या आपल्या उपक्रमांनी व नियोजनाने दरवर्षी विद्यार्थी संख्या वाढवत असतात. तेव्हा त्या नेमकं काय करतात याचा अभ्यास करण्याची नितांत गरज आहे. शालेय स्तरावर सर्वज्ञान आपण मातृभाषेतून देण्यास यशस्वी झालो तर मराठी भाषा खऱ्या अर्थाने अभिजात ज्ञानभाषा व जनभाषा झाल्याशिवाय राहणार नाही. या राष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये हिंदवी स्वराज्य उभे केले. आपण हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवत आजच्या प्रतिकूल परिस्थितीत मराठी शाळांचा उत्तम रीतीने दर्जा वाढवला तर अभिजात मराठी ज्ञानभाषा व जनभाषा झाल्याशिवाय राहणार नाही.

**प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे**
**के.रा. कोतकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली**
**९९६७८१७८७६**
prashantshirude1674gmail.com

# २५१ खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी तरीही स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणताहेत, हे चाललय तरी काय!

सध्या सर्वोच्च न्यायालयात दोषी राजकारण्यांवर आजीवन निवडणूक लढण्यावर बंदी असावी याकरीता जनहित याचिकेवर सुनवायी सुरू आहे.देशाच्या १८ व्या लोकसभेत निवडून आलेले ५४३ खासदारांपैकी २५१ खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत.यात ३९ टक्के मंत्री गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत,तर २८ खासदारांना वेगवेगळ्या कोर्टाने गुन्हेगार घोषित केले आहे.यातील १९ खासदारांवर हत्या आणि महिला अत्याचारांसारखे अत्यंत गंभीर आरोप आहेत,तरीही मोठ्या डौलाने सांगतात की आम्ही समाजसेवक,लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी आहोत.ही आश्चर्य व्यक्त करणारी व धक्कादायक बाब आहे. देशाची १४० कोटी जनसंख्या आहे त्यातील जर ४६ टक्के खासदार गुन्हेगार प्रकरणामध्ये दोषी असेल तर सर्वसामान्यांनी काय करावे! सध्याच्या परिस्थितीत २५१ खासदार दोषी आहेत म्हणजेच हे देशाच्या ६४ कोटी जनतेचे प्रतिनिधीत्व करीत आहेत.हीबाब स्वतंत्र भारतासाठी काळीमा फासणारी नाही का? गुन्हेगारीतुन आलेले खासदार जर देशाचे प्रतिनिधित्व करीत असेल तर हे देशाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.यामुळे देशाच्या लोकांना चिंता आहे की,देशाचे ४६ टक्के गुन्हेगारीने दोषी असलेले खासदार सर्वसामान्यांना खरोखरच न्याय देऊ शकेल काय?हा मोठा प्रश्न आज १४० कोटी जनते समोर उपस्थित होतो.त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, अशा खासदारांच्या क्षेत्रात गुन्हेगारीला जास्त वाव दिला तर जात नाही ना!असाही प्रश्न उपस्थित होतो.ज्या ठिकाणी गुन्हेगारीला चालना मिळते अशा क्षेत्रात गुन्हेगार खासदार निवडून आले असावेत असाही प्रश्न निर्माण होतो.परंतु अशा लोकसभा क्षेत्रातील सर्वसामान्यांचे कीती हालबेहाल व अन्याय होत असतील हे सांगणे मात्र अत्यंत कठीण आहे.२०१९ मध्ये गुन्हेगारीने बरबटलेले खासदार ४३ टक्के होते आता ती संख्या वाढुन २०२४ मध्ये ४६ टक्यावर येवून पोहोचली आहे.तरीही स्वतःला स्वच्छ, निस्वार्थी आणि चांगल्या प्रतिमेचे समजतात ही अत्यंत गंभीर बाब आहे.दोषी राजकारणी दोषमुक्त झाले असले तरी त्यांच्या रक्तात दोष अवश्य दिसून येईल.त्यामुळे दोषी राजकारण्यांना राजकारणातुन जळामुळासकट बाहेर करने अत्यंत गरजेचे आहे.गुन्हेगारीमध्ये दोषी राजकारण्यांचा आपण जर देशातील राज्यांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर १० राज्यातील तब्बल ५० टक्के खासदार गुन्हेगार क्षेत्रातुन आले आहेत अशाने गुन्हेगारीवर कसाकाय आळा बसेल हाही गहन आणि गंभीर विषय निर्माण होतो.देशाला गुन्हेगारीतुन मुक्त करायचे असेल तर सर्वप्रथम गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांवर अंकुश लावने अत्यंत गरजेचे आहे.कारण देशात गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांचा प्रवेश वाढला तर देशात हजारोंच्या संख्येने वाल्मिक कराड सारखे गुन्हेगार निर्माण होतील व प्रशासनाला गुन्हेगारीवर आळा घालण्यास मोठ्या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल. या संपूर्ण बाबी लक्षात घेता सरकारने कठोर पाऊल उचलने गरजेचे आहे.कारण गुन्हेगारांची परिभाषा गुन्हेगारीमध्येच गणल्या गेली पाहिजे व त्यांची जागा त्यांना दाखविली पाहिजे



असे मला वाटते.स्वच्छ व निर्मळ प्रशासन अंमलात आणण्यासाठी सर्वप्रथम गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांवर कठोर कारवाई करून त्यांना लोकप्रतिनिधी पदावरून हटविणे गरजेचे आहे. कारण अशा प्रवृत्तींच्या लोकांनी जबाबदार पदावर पदावर रहाने म्हणजे देशाचा अपमान समजल्या जाईल.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२११६९०७७९**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# मुलींच्या रक्षनार्थ राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण योजना सुरु करण्याची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील बहुतांश महत्वकांक्षी योजना बंद करण्यात आलेल्या आहेत यात हर घर योद्धा योजना, राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा योजना देखील गेल्या तीन वर्षापासून बंद असल्याने मुली वर्गात नाराजी पसरलेली असून मुलींच्या रक्षनांर्थली ही महत्वकांक्षी योजना मुख्यमंत्री, फडणवीस यांनी पुढकार घेत पुन्हा चालू करावी अशी रास्त मागणी जोर धरताना दिसत आहे. .राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण योजना गेल्या दोन तीन वर्षांपासून सुरू असलेल्या हि योजना अचानक बंद करण्यात आल्याने संताप व्यक्त केला जात असून. अलीकडे स्त्रीवर वाढत्या आत्याचाऱ्यांचा घटना पाहता महिलांच्या आत्मरक्षा प्रशिक्षणाच्या या योजना पुनःश चालू करण्यासाठी लोकप्रतिनिधीनी लक्ष घालावे ही मागणी महिला व पालक मंडळींतून केली जात आहे.संपुर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषद प्रशाला शाळेतील मुलींना आत्मरक्षा प्रशिक्षणाचा त्यांच्या भावी जीवनात नक्कीच लाभ मिळण्यासाठी हे प्रशिक्षण सुरू असताना अचानक या वर्षी बंद करून मुलींचे नुकसान झाले असल्याच्या प्रतिक्रिया पालकां कडून व्यक्त होताना दिसत असून याबाबत विचार होणे गरजेचे असल्याचा सुरु निघत आहे .परतूर तालुक्यातील एकुण ५६, जिल्हा परिषद शाळा आहेत या मध्ये ७ वी. ८ वी. ९ वी. वर्गातील मुलींना परिक्षीण देण्यात येत होते.यासर्व शाळेत मुलींची संख्या १०६४, एवढी आहे.यावर्षी सातत्याने प्रशिक्षण देण्यात आले असते तर यामुळे मुलींचाही आत्मविश्वास वाढला असता.प्रत्येक मुलगी मार्शल आर्ट प्रशिक्षण घेतलेली असली पाहिजे.ज्या मुलींनी आत्मरक्षणाचे धडे घेतले ती मुलगी एकटी निडरपणे घरी परत येवू शकते असा विश्वास तीच्या पालकाला असतो.याचा विचार मुख्यमंत्री साहेबांनी करावा राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण योजना पुन्हा सुरू कराव्यात.सर्व मुलींच्या पालकांची आपल्या कडे मागणी करण्यात येत आहे.



# मागासवर्गीयांसाठीचा निधी परत न करता कॅरी फॉरवर्ड व्हावा-घेवंदे

**जालना । प्रतिनिधी-** मागासवर्गीय विभागासाठी मंजुर झालेला निधी अनेकदा इतर विभागाकडे वळविण्यात येतो. इतकेच नव्हे तर हा निधी खर्च न झाल्याने परतही केला जातो. मात्र, असे न करता हा निधी कॅरी फॉरवर्ड करुन निधी वळती अथवा परत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे नोंदविण्याचा कायदा करावा, अशी मागणी जालना जिल्हा कॉंग्रेसच्या अनुसूचीत जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दिनकर घेवंदे यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात श्री. घेवंदे यांनी म्हटले आहे की, मागासवर्गीय विभागासाठी मंजुर झालेला निधी इतरत्र वळविण्याचा प्रकार बंद व्हावा म्हणुन कर्नाटक व आंध्रप्रदेश सरकारने विशेष कायदा केला आहे. हा निधी इतर विभागाकडे वळविणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारने सन २०४७ पर्यंत भारताला विकसीत राष्ट्र बनविण्याची घोषणा केलेली असलीतरी आजपर्यंत देशात अॅट्रॉसिटीच्या केसेस कमी झालेल्या नाहीत. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात मागासप्रवर्ग निधी नियोजन मंडळाची स्थापना केलेली आहे. सन २०१५ मध्ये निधी आयोगाने त्यास मान्यता दिली असून, यासाठी केंद्राने २ लाख ३० हजार कोटी रुपयांची तरतुद करणे आवश्यक होते. मात्र, बजेटमध्ये प्रत्यक्षात ६२ हजार कोटीच देण्यात आले असून, अॅट्रॉसिटी कायद्यासाठी २ लाख कोटींची तुटपुंजी तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारने मागासवर्गीयांच्या वस्तीगृहांसाठी ४० कोटीची तरतुद केली असल्याचे नमुद करून दरवर्षी १ हजार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी पाठवावे, अशी मागणी श्री. घेवंदे यांनी केली आहे. यासोबतच सामजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र वळवल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा कायदा आणणे गरजेचे असून, विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन देण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने ठोस पाऊले उचलावीत, अशी मागणी करुन या मागण्यांचा गांभीर्याने विचार न झाल्यास लोकशाही मार्गाने मंत्रालयासमोर आंदोलन करण्यात येईल आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी शासन-प्रशासनावर राहिल, असा इशारा श्री. घेवंदे यांनी या निवेदनाच्या शेवटी दिला आहे.

# संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील आरोपींना फाशी व्हावी या मागणीसाठी घाटकोपर शिवसेनावतीने आंदोलन



**घाटकोपर । प्रतिनिधी -** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील हादरवणारे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि सर्वच स्तरांतून या फोटो नंतर हळहळ व्यक्त करण्यात आली.अतिशय अमानुष पद्धतीनं देशमुख यांना माराहाण करत असूरी वृत्तीनं आरोपींनी हा गुन्हा केला आणि त्याची छायाचित्र,व्हिडीओ सुद्धा काढले.या कृत्याचा निषेध समाजाच्या सर्व स्तरांतून केला जात असून,आता ही मन हेलावणारी दृश्य व्हायरल झाल्यानंतर सर्वच स्तरातून आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी होत आहे. तसेच शिवसेना घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्राच्या वतीने घाटकोपर अमृत नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी संतोष देशमुख हत्याप्रकरणातील क्रूरकर्मा आरोपी वाल्मीक कराड याला फाशी व्हावी. तसेच या हत्याकांडात जे जे आरोपी आहेत व जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कायद्याद्वारे कठोरातील कठोर कारवाई व्हावी अशी मागणी करत निषेध म्हणून वाल्मीक कराड याच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करत आंदोलन करण्यात आले.यावेळी विधानसभा प्रमुख डॉ. सुबोध बावदाने,माजी नगरसेविका डॉ.भारती बावदाने,माजी नगरसेवक दिपक बाबा हांडे व घाटकोपर पश्चिम विधासभा क्षेत्रातील शिवसेनेचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.







# उपविभागीय अधिकारी डॉ. श्रीमंत हारकर यांनी केली जमिनीची स्थळ पाहणी

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्र्य रेषेखालील भुमिहीन शेजमजूर कुटुंबासाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना राबविली जाते. या योजनेच्या लाभासाठी उपविभागीय अधिकारी डॉ. श्रीमंत हारकर यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने दि.२८ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रत्यक्ष जमिनीची स्थळ पाहणी केली.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत जालना तालुक्यातील मौजे शिवनगर, उखळी, शिवणी, राठोडनगर, पाथ्रुड, धारा, खांबेवाडी, नागापूर या ठिकाणच्य जमिनीची स्थळ पाहणी करण्यात आली. या जमीन स्थळ पाहणीच्यावेळी तहसीलदार छाया पवार, भूमिअभिलेख उपअधिक्षक विष्णु राठोड यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी, गावकरी, शेती विक्री करणारे शेतकरी, संभाव्य लाभार्थी उपस्थित होते.

### खासदार डॉ.कल्याण काळे यांची विभागीय रेल्वे व्यवस्थापक निती सरकार यांच्या समवेत बैठक संपन्न

# मनमाड-छत्रपती संभाजीनगर रेल्वे दुहेरीकरण, विद्युतीकरण, मालवाहतूक सुविधा, प्रवाशांच्या सुविधेबाबत चर्चा

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील रेल्वे समस्या, प्रवासी सुविधा, औद्योगिक विकास आणि रखडलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक (उठ्व्) आणि वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत मनमाड-औरंगाबाद रेल्वे दुहेरीकरण, नांदेड मंडळातील विद्युतीकरण, औद्योगिक क्षेत्रांसाठी मालवाहतूक सुविधा तसेच प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा सुधारणा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत मांडण्यात आलेल्या प्रमुख मागण्या आणि समस्या

प्रवासी सुविधांची कमतरता

जालना शहरातील रेल्वे आरक्षण सुविधा दोन वर्षांपूर्वी जुना जालना पोस्ट ऑफिस येथे मंजूर करण्यात आली होती, मात्र ती अद्याप कार्यान्वित झालेली नाही. रेल्वे आणि पोस्ट ऑफिस प्रशासनातील समन्वयाअभावी प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

औरंगाबाद, मुकुंदवाडी, बदनापूर, करमाड, लासूर आणि जालना स्थानकांवर कोच इंडिकेशन बोर्ड, प्रतीक्षालय (वेटिंग हॉल), स्वच्छतागृह व कवरिंग शेड उभारणीची मागणी करण्यात आली आहे.

रेल्वेगाड्यांचा विस्तार व नव्या गाड्यांची मागणी

रामेश्वरम-ओखा एक्सप्रेस (१६७३३/१६७३४) आठवड्यातून किमान दोन दिवस चालवावी.

नांदेड-तांडूर-रायचूर एक्सप्रेस (१७६६३/१७६६४) चा विस्तार औरंगाबाद व जालना पर्यंत करण्यात यावा.

जालना-नगरसोल डेमू गाडी (०७४९३/०७४९४) ही दररोज दोन वेळा चालवावी.

औरंगाबाद-बेंगलोर नवीन एक्सप्रेस गाडी सुरू करण्याची मागणी.

जालना-मनमाड-ओखा आणि जालना-मनमाड-जोधपूर-बिकानेर मार्गांवर आठवड्यातून एक दिवस नवीन गाडी चालवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

रेल्वेगाड्यांचे ठराविक ठिकाणी थांबे

निजामाबाद-पुणे पॅसेंजर (११४१०), मराठवाडा एक्सप्रेस (१७६८८/१७६८७) आणि दौंड-निजामाबाद पॅसेंजर (११४०९) यांना पुन्हा थांबे देण्याची मागणी.

नांदेड-पुणे एक्सप्रेस (१७६३०/१७६२९) चे वेळापत्रक प्रवाशांच्या सोयीसाठी पुनर्रचित करण्याची विनंती.

औरंगाबाद-गुंटूर एक्सप्रेस ला हैदराबाद डेक्कन येथे थांबा देण्याची मागणी.

बदनापूर रेल्वे स्थानकावर एक्सप्रेस ट्रेनला थांबा द्यावा.

औद्योगिक पार्सल सुविधा

औरंगाबाद आणि जालना हे महत्त्वाचे औद्योगिक केंद्र असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर पार्सल बुकिंग होते.

रेल्वे प्रशासनाने स्वतंत्र मालधक्का व पार्सल सुविधा उपलब्ध करावी, यासाठी प्रयत्न करण्याची मागणी करण्यात आली.

झेंडा चौक आणि गेट नंबर ५६ येथे प्रत्यक्ष पाहणी

बैठकीनंतर खासदार डॉ. कल्याण काळे, विभागीय रेल्वे व्यवस्थापक निती सरकार आणि रेल्वे अधिकाऱ्यांनी मुकुंदवाडी येथील झेंडा चौक आणि गेट नंबर ५६ येथे प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

झेंडा चौक येथे उड्डाणपुल व अंडरपास उभारणीबाबत चर्चा करण्यात आली.

प्रवाशांची वाढती संख्या आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता, हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.

गेट नंबर ५६ येथे दोन अंडरपास उभारण्याची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या भागात रेल्वे फाटक बंद राहिल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

खासदार काळे यांनी या दोन्ही ठिकाणी कामाच्या प्रगतीचा अहवाल तातडीने सादर करण्याच्या सूचना रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या.

रेल्वे अधिकाऱ्यांकडून महत्त्वपूर्ण आश्वासने

मनमाड-औरंगाबाद रेल्वे दोहरीकरण प्रकल्प अंतिम टप्प्यात असून लवकरच पूर्ण होईल.

विद्युतीकरण कार्यही वेळेत पूर्ण होणार असून, अनेक स्थानकांवरील सुधारणा लवकरच सुरू करण्यात येणार आहेत.



जालना, औरंगाबाद आणि बदनापूर स्टेशनांवरील पार्सल सुविधांसाठी स्वतंत्र योजना तयार केली जाईल.

प्रवासी सुविधा सुधारण्यासाठी रेल्वे स्थानकांवर आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याची तयारी सुरू आहे.

लोकप्रतिनिधींच्या महत्त्वाच्या सूचना आणि पुढील कार्यवाही

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी पुढील महत्त्वाच्या सूचनांचा आग्रह केला -

मुकुंदवाडी येथील झेंडा चौक येथे ओव्हर ब्रिज व अंडरपास बनवण्याची तातडीने अंमलबजावणी करावी.

गेट नंबर ५६ येथे दोन अंडरपास लवकरात लवकर सुरू करावेत.

जालना-औरंगाबाद-जालना मार्गावर शटल ट्रेन चालू करावी.

जालन्यावरून सायंकाळी मुंबईला जाण्यासाठी आणि मुंबईहून औरंगाबाद-जालन्याकडे येण्यासाठी नवीन रेल्वेसेवा सुरू करावी.

जालना रेल्वे स्टेशन परिसरातील स्टेडियमचा विकास करण्यासाठी योजना तयार करून मंजुरीसाठी पाठवावी.

जालना येथे मोकळ्या जागेवर जॉगिंग ट्रॅक तयार करावा.

पुढील बैठक व कार्यवाही

या सर्व मागण्यांचा आढावा घेण्यासाठी पुढील तीन महिन्यांत विशेष बैठक आयोजित करण्यात येईल. प्रवाशांनी आपल्या तक्रारी आणि सूचना रेल्वे मंत्रालय, उठ्व् कार्यालय आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवाशांनी सहकार्य करून आपल्या मागण्या लेखी स्वरूपात सादर कराव्यात, जेणेकरून त्या लवकरात लवकर पूर्ण होऊ शकतील.

रेल्वे सुविधा सुधारणा ही काळाची गरज आहे - प्रवाशांच्या सोयीसाठी लढा सुरूच राहील! असे आश्वासन खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिले.

## शहरातील झोपडपट्ट्यांमधील नागरिकांचे पीआर कार्ड द्या - भास्कर अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे पीआर कार्ड व रेल्वेच्या मोकळ्या जागेवर जॉगिंग ट्रॅक, स्टेडियम उभारून रेल्वे स्टेशनपासून ग्लोबल शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यासंदर्भात सत्ताधाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केली आहे.

जालना शहरातील हनुमान घाट येथे स्व.बालचंद कन्हैयालाल भुरेवालद्वार या प्रवेशद्वाराचे उद्घाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार कैलास गोरंट्याल व सर्वपक्षीय पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बोलताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, (माजी केंद्रीय रावसाहेब दानवे यांना उद्देशून)तुम्ही पराभूत झालात तरी केंद्रात व राज्यात तुमची सत्ता आहे. जालना शहराचे अनेक प्रश्न जे शासन स्तरावर प्रलंबित आहेत शहरात ४० टक्के गोरगरीब हे शहरातील जवळपास ५० झोपडपट्ट्यात राहतात. त्या शासकीय जमिनीवर आहेत. शासनाच्या घरकुल योजना करिता निधी येऊनही या झोपडपट्ट्यांमध्ये राहणार्या नागरिकांना या जागेचा मालकी हक्क नसल्याने त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. चार-चार पिढ्याने त्या जागेवर हे लोक राहत आहेत. त्या वस्त्यांमध्ये महानगरपालिका सर्व नागरी सुविधा ही पुरवत आहे. मग त्या नागरिकांना पीआर कार्ड का मिळू नये? ज्यामुळे या योजनांचा त्यांना लाभ मिळेल. शहरात रेल्वेची शेकडो एकर जागा आहे. स्वयंवर मंगल कार्यालय ते

अण्णाभाऊ साठेनगर या प्रमुख रस्त्यावर रेल्वेच्या जागेवर मोठ्या मोठ्या बाभळीचे जंगल तयार झाले आहे. या मोकळ्या जागेवर जॉगिंग ट्रॅक केल्यास शहरातील नागरिकांना महिलांना सकाळी रस्त्यावर फिरण्याऐवजी रेल्वेच्या मैदानावर फिरता येईल. तसेच सध्याच्या रेल्वे ग्राउंडवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे सुसज्ज स्टेडियम उभारल्यास राज्य, प्लॅटफॉर्म वरून सरळ बायपास रस्त्याला जातील व वाहतूक सुरळीत होईल.

पुढे अंबेकर म्हणाले की, आपण जरी पराभूत झाला तरी केंद्रात राज्यात तुमची सत्ता आहे. सत्तेत तुमच्या शब्दाला किंमत आहे. तुम्ही शहर व जिल्ह्याच्या विकासासाठी स्थानिक आमदार, खासदार, व शहरातील अभ्यासू नागरिक यांची बैठक घेऊन कुठलाही पक्षभेद न ठेवता हे प्रश्न सोडवावेत अशी भूमिका जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी मांडली. त्यास उत्तर देताना माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, येत्या दोन महिन्यात सर्व लोकप्रतिनिधी व शहरातील काही नागरिक यांना सोबत घेऊन एक बैठक घेऊ

त्यावेळी सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले जाईल असे ते म्हणाले. यावेळी भास्करराव दानवे, बाला परदेशी,सुनील खरे, कपिल भुरेवाल, रविकांत जगधने, संतोष माधवले, धनराज कांबळिये यांच्यासह आदी सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन हेमराज भुरेवाल, कचरू भरेवाल, नेमीचंद भुरेवाल, संदीप नाईकवाडे यांनी केले.



## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेच्या लाभार्थ्यांस आर्थिक मदतीचे वितरण




**जालना । प्रतिनिधी -** बँक ऑफ महाराष्ट्र विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर, जिल्हा अग्रणी बँक व आर्थिक साक्षरता केंद्र तसेच बँक ऑफ महाराष्ट्र शाखा दानापुरच्या वतीने केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत नईम मोईन शेख यांना विमा रकमेचे वितरण प्रबंधक विवेक नाचणे यांच्या हस्ते करण्यात आले.या योजनेचा उद्देश कुटुंबियांना आर्थिक सुरक्षेची हमी देणे हा आहे. आपल्या कुटुंबातील सदस्यांची आर्थिक सुरक्षिततेसाठी विमा योजना आवश्यक आहे, तरी जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विवेक नाचणे यांनी केले आहे.

जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे यांनी सांगितले की, या योजनेअंतर्गत गरीब गरजू कुटुंबास आर्थिक मदतीचा लाभ मिळाला असून, भविष्यातही गरजू नागरिकांसाठी या योजनेचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय बँकांकडून करण्यात येत आहे. १८ ते ५० वर्षे वयोगटातील नागरिकांसाठी ही योजना खुली आहे. वार्षिक फक्त ४३६ रुपयांच्या प्रीमियममध्ये २ लाखांचा विमा संरक्षण मिळतो. मृत्यूनंतर कुटुंबियांना थेट आर्थिक मदत दिली जाते. असा या योजनेचा फायदा होतो. या कार्यक्रमास बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक विवेक नाचणे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे, दानापूर शाखेचे व्यवस्थापक राहुल भिलाणे, वित्तीय साक्षरता अधिकारी कैलास तावडे उपस्थित होते. लाभार्थ्यांनी यावेळी सरकारच्या योजनेबद्दल समाधान व्यक्त केले.